राज्यातील आजी/माजी सैनिक, युद्ध विधवा, शौर्यपदक धारक तसेच त्यांच्या कुटुंबीयांच्या विविध प्रश्न व अडीअडचणींचे तातडीने निराकरणासाठी प्रत्येक जिल्ह्यात दर दोन महिन्यांनी "माजी सैनिक विशेष जनता दरबार" आयोजित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२०२६/प्र.क्र.३६५/मासैक
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ५ नोव्हेंबर, २०२६

संदर्भ :-

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२५/प्र.क्र.३६३/मासैक, दिनांक १५ डिसेंबर, २०२५.

प्रस्तावना :-

महाराष्ट्र राज्यातील आजी/माजी सैनिक, युद्ध विधवा, शौर्यपदक धारक तसेच त्यांच्या कुटुंबीयांच्या विविध कल्याणकारी योजना, आर्थिक सहाय्य, जमिनविषयक प्रकरणे, अतिक्रमण, निवृत्तीवेतन, पुनर्वसन, प्रशासकीय अडचणी तसेच इतर प्रश्नांचे निराकरण करण्यासाठी शासन स्तरावर विविध उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत.

सामान्य प्रशासन विभागाच्या दि. १५ डिसेंबर २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यातील आजी/माजी सैनिकांचे प्रश्न सोडविण्यासाठी व माजी सैनिकांच्या पुर्नवसनाच्या विविध कल्याणकारी योजना राबविण्याकरीता जिल्हा स्तरावरील समितीची पुनर्रचना करण्यात आली आहे.

माजी सैनिकांच्या प्रश्नांचे स्वरूप हे विविध विभागांशी संबंधित असल्याने त्यांच्या तक्रारींचे एकाच ठिकाणी निराकरण करण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली नियमितपणे विशेष जनता दरबार आयोजित केल्यास प्रशासनातील विविध विभागांमध्ये अधिक प्रभावी समन्वय साधता येईल. माजी सैनिक मेळाव्यामध्ये माजी सैनिकांचे प्रश्न, अडीअडचणी व प्रलंबित प्रकरणे यांचे अधिक परिणामकारक व कालबद्ध पद्धतीने निराकरण होण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या स्तरावर दर दोन महिन्यांनी विशेष जनता दरबार आयोजित करण्याबाबत निर्देश देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

१. राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात **दर दोन महिन्यांनी किमान एकदा जिल्हास्तरीय "माजी सैनिक विशेष जनता दरबार"** आयोजित करण्यात यावा.सदर जनता दरबाराचे अध्यक्षस्थान संबंधित **जिल्हाधिकारी** भूषवतील.

२. जनता दरबारासाठी संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांची उपस्थिती

सदर जनता दरबारास माजी सैनिकांच्या तक्रारी व प्रकरणांशी संबंधित सर्व विभागांचे जिल्हास्तरीय प्रमुख/अधिकारी उपस्थित राहतील.विशेषतः खालील विभागांच्या अधिकाऱ्यांची आवश्यकतेनुसार उपस्थिती सुनिश्चित करण्यात यावी .

१. महसूल विभाग
२. भूमी अभिलेख विभाग
३. जिल्हा परिषद
४. पोलीस यंत्रणा
५. सैनिक कल्याण विभाग
६. जिल्हा कोषागार कार्यालय
७. समाजकल्याण विभाग
८. नगरविकास शाखा
९. कृषी विभाग
१०. वन विभाग
११. जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाशी संबंधित अधिकारी, आवश्यकतेनुसार

आवश्यकतेनुसार जिल्हाधिकारी संबंधित विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना जनता दरबारास उपस्थित राहण्याचे निर्देश देऊ शकतील.

३. जिल्हा सैनिक कल्याण अधिकाऱ्यांची जबाबदारी

संबंधित **जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी** हे या विशेष जनता दरबाराचे समन्वयक म्हणून काम पाहतील. त्यानुषंगाने पुढील कार्यवाही करण्याची जबाबदारी **जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांची राहील.**

१. माजी सैनिक, युद्ध विधवा, शौर्यपदक धारक व त्यांच्या कुटुंबीयांकडून प्राप्त तक्रारींची पूर्वनोंदणी करावी.
२. तक्रारींचे विभागनिहाय वर्गीकरण करावे.
३. प्रत्येक प्रकरणाची सद्यस्थिती व संबंधित विभागाची माहिती संकलित करावी.
४. जनता दरबाराच्या किमान सात दिवस आधी संबंधित विभागांना प्रकरणांची यादी उपलब्ध करून द्यावी.
५. जनता दरबारात झालेल्या निर्णयांची व दिलेल्या निर्देशांची नोंद ठेवावी.
६. प्रलंबित प्रकरणांचा नियमित पाठपुरावा करावा.
७. पुढील जनता दरबारापूर्वी मागील बैठकीतील प्रलंबित प्रकरणांचा अनुपालन अहवाल जिल्हाधिकाऱ्यांना सादर करावा.

४. प्रकरणांच्या कालबद्ध निराकरणाबाबत

जनता दरबारामध्ये प्राप्त झालेल्या तक्रारींचे स्वरूप व प्रचलित कायदे/नियम यानुसार त्यांचे **कालबद्ध पद्धतीने निराकरण** करण्यात यावे.ज्या प्रकरणांचे तत्काळ निराकरण शक्य नाही, अशा प्रकरणांमध्ये संबंधित अधिकाऱ्यांनी कारणे, अपेक्षित कार्यवाही व संभाव्य कालमर्यादा स्पष्टपणे नमूद करावी.माजी सैनिकांच्या प्रकरणांमध्ये अनावश्यक विलंब होणार नाही याची संबंधित विभागप्रमुखांनी दक्षता घ्यावी.

५. प्राधान्याने हाताळावयाची प्रकरणे:-

विशेष जनता दरबारामध्ये खालील बाबींशी संबंधित प्रकरणांना प्राधान्य देण्यात यावे :-

१. माजी सैनिक, युद्ध विधवा व शौर्यपदक धारकांची जमीनविषयक प्रकरणे.
२. जमीन अतिक्रमण व ताबा प्रकरणे.
३. शासकीय जमीन/पुनर्वसन/जमीन वाटपाशी संबंधित प्रकरणे.
४. माजी सैनिक व त्यांच्या विधवांना मिळणारे आर्थिक सहाय्य.
५. निवृत्तीवेतन व पेन्शनशी संबंधित प्रकरणे.
६. शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांशी संबंधित प्रकरणे.
७. माजी सैनिक व त्यांच्या कुटुंबीयांवर होणाऱ्या अन्यायाबाबतच्या तक्रारी.
८. वारसाहक्क, प्रमाणपत्रे व महसूल नोंदीशी संबंधित प्रकरणे.
९. स्थानिक स्वराज्य संस्था/पोलीस/महसूल विभागाशी संबंधित प्रकरणे.
१०. शासनाच्या पुनर्वसन व इतर कल्याणकारी योजनांच्या लाभाबाबतची प्रकरणे.

६. माजी सैनिक किंवा त्यांच्या कुटुंबीयांना प्रत्यक्ष उपस्थित राहणे शक्य नसल्यास, त्यांच्या विनंतीनुसार किंवा प्रकरणाच्या स्वरूपानुसार **दूरदृश्य प्रणालीद्वारे** (Video Conferencing) **जनता दरबारात सहभागी होण्याची सुविधा** उपलब्ध करून देण्यात यावी.

७. अनुपालन अहवाल

प्रत्येक विशेष जनता दरबारानंतर जिल्हा सैनिक कल्याण अधिकाऱ्यांनी संबंधित जिल्हाधिकाऱ्यांच्या मान्यतेने खालील माहितीचा अहवाल तयार करावा :-

- प्राप्त एकूण तक्रारी
- विभागनिहाय तक्रारी
- तात्काळ निकाली काढलेली प्रकरणे
- प्रलंबित प्रकरणे
- प्रलंबित राहण्याची कारणे
- संबंधित अधिकाऱ्यांना दिलेले निर्देश
- पुढील कार्यवाहीची कालमर्यादा
- मागील जनता दरबारातील प्रलंबित प्रकरणांवरील कार्यवाही.

सदर अहवालाची प्रत **संचालक, सैनिक कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे** यांना सादर करण्यात यावी.संचालक, सैनिक कल्याण विभाग यांनी जिल्हानिहाय प्राप्त अहवालांचे संकलन व परीक्षण करून आवश्यकतेनुसार शासनास अवगत करावे.

८. जिल्हाधिकाऱ्यांची विशेष जबाबदारी

संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी या विशेष जनता दरबाराचे आयोजन नियमितपणे होत असल्याची व त्यामध्ये प्राप्त प्रकरणांवर परिणामकारक कार्यवाही होत असल्याची खात्री करावी.विशेषतः माजी सैनिकांच्या जमीनविषयक, अतिक्रमण, पेन्शन व कल्याणकारी योजनांशी संबंधित प्रकरणांमध्ये संबंधित विभागांमध्ये समन्वय साधून कालबद्ध कार्यवाही करण्यात यावी.

९. प्रसिद्धी व जनजागृती

प्रत्येक जिल्ह्यात विशेष जनता दरबाराची तारीख, वेळ, ठिकाण व तक्रार नोंदणीची पद्धत याबाबतची माहिती जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय तसेच उपलब्ध असलेल्या अधिकृत संकेतस्थळ/समाजमाध्यमांवर प्रसिद्ध करण्यात यावी.तसेच माजी सैनिक संघटना, माजी सैनिक मंडळे व संबंधित कल्याणकारी संस्थांना याबाबत पूर्वसूचना देण्यात यावी.

१०. बैठकीचे वेळापत्रक

विशेष जनता दरबार **दर दोन महिन्यांनी किमान एकदा** आयोजित करण्यात यावा.प्रत्येक जिल्ह्याने वर्षाच्या सुरुवातीस अशा जनता दरबारांचे अंदाजित वेळापत्रक निश्चित करून त्यानुसार कार्यवाही करावी.

११. या शासन निर्णयातील तरतुदी दिनांक **१५ डिसेंबर २०२५** रोजीच्या शासन निर्णयातील जिल्हा स्तरावरील समिती, तिची रचना, कार्यकक्षा व बैठकीच्या तरतुदींना बाधक राहणार नाहीत. सदर शासन निर्णयातील तरतुदी पूर्ववत लागू राहतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६११०५१११९००८५०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by GANESH NIVRUTTI PAWAR
Date: 2026.11.05 11:20:01 +05'30'

(गणेश पवार)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव.
२. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अपर मुख्य सचिव.

३. मा. उप मुख्यमंत्री, (नगर विकास)महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव
४. मा. उप मुख्यमंत्री, (राज्य उत्पादन शुल्क) महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव
५. मा. मंत्री, माजी सैनिक कल्याण यांचे खाजगी सचिव.
६. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन.
७. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालयीन विभाग.
८. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
९. सर्व विभागीय आयुक्त.
१०.सर्व जिल्हाधिकारी.
११.संचालक, सैनिक कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१२.सर्व जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी.
१३.निवड नस्ती.